# व्याख्यान : 2

## प्रा.डॉ.एस.बी.घाटगे

VIVEKANAND COLLEGE
ESTD.
JUNE
1964
KOLHAPUR-416003

" ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार "
- शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे

**विवेकानंद कॉलेज (स्वायत्त) कोल्हापूर**

**मराठी विभाग आयोजित**

**मराठी भाषा संवर्धन पंधरवडा : १ जानेवारी २०१९ ते १५ जानेवारी २०१९**

**व्याख्यान : मराठी भाषेचा विकास**


## कार्यक्रम पत्रिका

- स्वागत व प्रास्ताविक : कु. प्रिया बुराण
  बी.ए.भाग 1
- प्रमुख पाहुण्यांचे मार्गदर्शन : प्रा. डॉ. शर्मिला घाटगे
  मराठी विभाग, विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर
- अध्यक्षीय मनोगत : प्रा. बी. के. गोसावी
  मराठी विभाग प्रमुख, विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर
- आभार : श्री. अनिकेत पाटील बी.ए.भाग १

स्थळ : रुम नं. १४
दिनांक : शनिवार दि. ५ जानेवारी २०१९
वेळ : सकाळी १०.०० वा.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR-416003 ESTD. JUNE 1964

व्याख्यान - 2




प्रा. डॉ. शर्मिला घारगे 'मराठी भाषेचा विकास' या विषयावर मार्गदर्शन करताना.




कार्यक्रमाचे आभार मानताना बी.ए.3 ची विद्यार्थिनी कु. मानसी शिंदे.

# मराठी भाषा समृध्द ज्ञान जाणिवांची प्रगल्भता

**प्रा. डॉ. शर्मिला घाटगे**

कोल्हापूर दि. ०५ : महाराष्ट्र ही संत, पंत व शाहिरांची कर्मभूमी आहे. या प्राचीन कालखंडातील मराठी भाषेला वैभवसंपन्नता प्राप्त झाली होती. फारशी आणि इंग्रज राजसत्ता येऊन देखील मराठीचे भाषापण टिकून होते. मात्र आज मराठीची अवस्था इतर भाषांच्या आक्रमण आणि प्रभावामुळे दुबळी बनत चालली आहे. यासाठी आजची प्रसारमाध्यमे आणि लोकप्रशासन यांनी मराठी भाषा टिकवण्यासाठी प्रयत्नशील राहायला हवे आणि मराठी भाषा ही ज्ञानभाषा म्हणून सर्वदूर पसरली पाहिजे. असे विचार विवेकानंद कॉलेज येथे आयोजित मराठी भाषा संवर्धन पंधरवडा या निमित्त **मराठी भाषेचा विकास** या विषयावर बोलताना विवेकानंद कॉलेज येथील मराठी विषयाच्या प्रा.डॉ. शर्मिला घाडगे यांनी मांडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठी विभाग प्रमुख प्रा बी के गोसावी होते.

अध्यक्षीय भाषणात प्रा.गोसावी म्हणाले, मराठी भाषा ही भोवतालच्या अनेक बोली भाषेमुळे समृध्द झाली आहे. एकेकाळी भाषेतील शब्दकोडी सोडविणे, हुमने म्हणणे, नाव घेणे, पाळणा म्हणणे, विविध लोकबोलीतून व्यक्त होणे यामुळे भाषेला एक वेगळेपणा व्यक्त होत होता.परंतु आज टीव्ही , मोबाईल, संगणक , चित्रपट या माध्यमांच्या युगात मराठी भाषा ही कुठेतरी मागे सरकत आहे अशी खंत ओस पडत चाललेल्या प्राथमिक शाळा उच्च शिक्षित मुलांच्या प्रश्नाकडे लक्ष दिल्यास यातील उणीव जाणवते. मराठी भाषा संवर्धनासाठी मराठीचा सर्व थरातून वापर केला पाहिजे. आपल्या मनोगतात प्रा डॉ सौ पी ए पाटील म्हणाल्या जगात सगळया भाषा श्रेष्ठ आहेत. पण जी भाषा ज्या राज्यात जास्त वापरली जाते व व्यवहारीक दर्जा प्राप्त करते. ती शिकणे व तिचा प्रसार होणे गरजेचे आहे. त्यादृष्टीने महाराष्ट्रात मराठी भाषा टिकली पाहिजे.

प्रास्ताविक कु. मानसी शिंदे हिने केले, आभार ओंकार बुचडे यांनी मानले. या कार्यक्रमास मराठी विभागातील विद्यार्थी, विद्यार्थिनी बहुसंख्येने सहभागी झाले होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ एस वाय होनगेकर यांच्या मार्गदर्शनाखाली मराठी विभागाच्या वतीने या कार्यक्रमाचे संयोजन केले होते.

---

## विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर

जा.क्र.व्हीसीके/ /२०१८-१९ दिनांक : ०५.०१.२०१९

प्रति,
मा. संपादकसो,
दैनिक ----------------------
कोल्हापूर .

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात फोटोसह प्रसिध्द करुन सहकार्य करावे ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू ,

VIVEKANAND COLLEGE ESTD. JUNE 1964 KOLHAPUR-416003

(डॉ. एस.वाय.होनगेकर)